नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 08/03/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कुही :– अंतर्गत ग्रामीण रूग्णालय कुही येथे दिनांक 06/03/2021 चे 19:30 वा. ते 21.00 वा. दरम्यान सौ. कविता ज्ञानेश्वर जिभकाटे (मृतक)वय 45 वर्ष, रा. वार्ड क्र. 07 कुही हि घरी एकटी हजर असतांना घराचा दरवाजा आतुन बंद असल्याने फिर्यादी रात्री 09.00 वा दरम्यान दरवाजा उघडण्यास आवाज दिला असता दरवाजा उघडला नाही. म्हणुन फिर्यादीने दरवाजाच्या फटी मधुन पाहीले असता व खिडकी मधुन पाहीले असता फिर्यादीची पत्नी स्लॅबला असलेल्या कडीला नायलॉन दोरीने गळफास घेतल्याचे दिसले. फिर्यादीने दरवाजा तोडुन आतमध्ये जावुन फिर्यादीने व फिर्यादीच्या मुलाने मृतकच्या गळ्यातील गळफास काढुन तिला मोटरसायकलवर बसवुन ग्रामीण रूग्णालय कुही येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर पांडरंग जिभकाटे, वय 53 वर्ष, रा. वार्ड क्र. 07 कुही यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नामदेव पुजारी हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. कुही :– अंतर्गत लता मंगेशकर कॉस्पीटल हिंगणा रोड, नागपूर येथे दिनांक 22/01/2021 चे 15.30 वा. दरम्यान राकेश विठ्ठल ठाकरे, वय 19 वर्ष, रा. मेंढगाव ता. कुही हा शेतात पाणी देण्याकरीता गेला असता दरम्यान त्याला अचानक सापाने चावा घेतला. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकरीता प्रथम मेडीकल कॉलेज नागपूर व नंतर लता मंगेशवकर हॉस्पीटल हिंगणा रोड नागपूर येथे उपचार उपचारादरम्यान दि. 07/02/21 चे 12.30 वा डाक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ललित दशरथ चलपे, वय 31 वर्ष, रा. पतकखेडी ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस शिपाई श्री. गिरीधर राठोड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर